आस्थापना विभाग कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र.:-आस्था/ २६०८
दिनांक :- २४/०६/२०२१

मा.उप आयुक्त परिमंडळ क्र १ ते ५
मा.शिक्षणाधिकारी (माध्यमिक व तांत्रिक)
मा.शिक्षण प्रमुख शिक्षण मंडळ
मा.आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका

यांजकडेस सविनय सादर....

विषय:- कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळाच्या तक्रारींची चौकशी करणेसाठी प्रत्येक कार्यालयात '' अंतर्गत तक्रार समिती गठित'' करणेबाबत.

संदर्भ:- १) आमचे कार्यालयाकडील जा.क्र.आस्था/७५८ दि.०८/०५/२०१५.
२) आमचे कार्यालयाकडील जा.क्र.आस्था/१६ दि.०१/०४/२०२१.
३) महिला व बाल विकास यांचेकडील शासन निर्णय क्रमांक - मकचौ-२०१३/प्र.क्रं.३/मकक दि.१९/०६/२०१४.

विषयांकित प्रकरणी पुणे महानगरपालिकेमध्ये कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळाच्या तक्रारींची चौकशी करणेसाठी प्रत्येक कार्यालयात '' अंतर्गत तक्रार समिती गठित'' करणेबाबत आपणांस संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार आपण आपले स्तरावर विषयांकित समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीचा कार्यकाळ ३ वर्षे पूर्ण झाला असून नविन सदस्यांची नेमणूक करणेस संदर्भ क्र. २ अन्वये आपणांस कळविण्यात आले होते.

तसेच विषयांकित समिती अद्याप पर्यंत गठित केली नसल्यास ती तात्काळ गठित होण्याचे दृष्टीकोनातून आपण संबंधितांना त्वरित आदेश देऊन अशी समिती त्वर्येने संदर्भ क्र. ३ च्या शासन निर्णयानुसार गठित होईल याबाबत समक्ष लक्ष घालून कार्यवाही करावी. तसेच ज्या कार्यालयीन आदेशान्वये समिती गठीत करणेत आलेली आहे त्याची प्रत आमचे कार्यालयाकडे पाठविणेस विनंती आहे.

(प्रकाश मोहिते)
सदस्य सचिव
अंतर्गत तक्रार समिती
तथा प्र.प्रशासन अधिकारी,आस्थापना विभाग
पुणे महानगरपालिका